पोलीस स्टेशन एटापल्ली
जिल्हा – गडचिरोली

**N.C.R.B (एन.सी.आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
**(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)**

1. **District (जिल्हा):** गडचिरोली **P.S.(ठाणे):** एटापल्ली

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0038 **Year (वर्ष):** 2023

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 18/06/2023 01:28

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** शनिवार
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 17/06/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 17/06/2023
**Time From (वेळेपासून):** 13:57 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 18:05 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 18/06/2023 **Time (वेळ):** 00:20 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 001
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 18/06/2023 00:20 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** जांबुळकर सेतु केंद्र, एटापल्ली,एटापल्ली, 442704

(c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): विश्वनाथ रतिराम जांभुळकर

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1973

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | वार्ड नं 19 फॉरेस्ट ऑफिस ,एटापल्ली,एटापल्ली,एटापल्ली,गडचिरोली,महाराष्ट्र, 442704,भारत |
| 2 | स्थायी पता | वार्ड नं 19 फॉरेस्ट ऑफिस ,एटापल्ली,एटापल्ली,एटापल्ली,गडचिरोली,महाराष्ट्र, 442704,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय): शिक्षक

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-9421856931

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | धनिराम अंताराम पोरेटी | | | 1. एटापल्ली बिट वनपरिक्षेत्र , कार्यालय एटापल्ली,एटापल्ली, एटापल्ली,गडचिरोली,महाराष्ट्र, भारत-442704 |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|

| **S.No. (अ.क्र.)** | **Property Category (मालमत्ता वर्ग)** | **Property Type (मालमत्ता प्रकार)** | **Description (वर्णन)** | **Value(In Rs/-) (मुल्य (रू.** |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक सामान | ध्वनी उपकरणे | 32 जी.बी मेमोरी कार्ड | 0.00 |
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500/ दराच्या 30 चलनी नोटा | 15,000.00 |
| 3 | इतर | संकीर्ण/विविध | आरोपी यांचा निळ्या रंगाचा जुना वापरता जिन्सपन्ट | 0.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

15,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No. (अ.क्र.)** | **UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.)** |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

पोलीस स्टेशन एटापल्ली

दिनांक 17/06/2023

मी श्री. विश्वनाथ रतीराम जांभुळकर, वय 50 वर्षे, धंदा- शिक्षक, विनोबा आश्रम शाळा गेदा रा. वार्ड क्र. 11 फॉरेस्ट ऑफीस समोर एटापल्ली ता.एटापल्ली जि. गडचिरोली येथे राहत असुन दिनांक 17/06/2023 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथे फोनव्दारे एका लोकसेवकाविरूध्द तक्रार असल्याबाबत माहिती दिली. त्यानुसार आज दिनांक 17/03/2023 रोजी लाचलचुपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली येथील पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले,शासकिय पंच व स्टाफसह शासकिय वाहनाने मौजा एटापल्ली येथे पोहोचले. त्यांनी सांगितल्याप्रमाणे मी एटापल्ली येथील पीडब्ल्युडी विश्रामगृह येथे हजर होतो. त्यांचे समक्ष लोकसेवकांविरूद्ध लाच मागणी संबंधाने तक्रार दिली ती खालीलप्रमाणे आहे.

माझ्याकडे दोन ट्रॅक्टर असुन ट्रॅक्टर क्रमांक एमएच 33 एससी 2530 ही माझी पत्नी सौ. राजश्री जांभुळकर हिचे नावे आहे व दुसरी ट्रॅक्टर काही दिवसापुर्वीच माझे नावे घेतल्याने तिचे क्रमांक मला प्राप्त झाले नाही. सदर ट्रॅक्टरने आम्ही एटापल्ली परिसरात रेती, गिटटी मटेरीयल पुरवठा करण्याचे काम करतो.

दिनांक 03/06/2023 रोजी आलदंडी गावाजवळील नदीमधुन रेतीची वाहतुक करीत असतांना एटापल्ली नाक्याजवळ श्री. पोरेटी, वनरक्षक, एटापल्ली बिट यांनी माझे दोन्ही ट्रॅक्टर पकडले व ते सोडण्याकरीता 30,000/- रू. मागीतले असल्याचे माझे ट्रॅक्टर चालक श्री. संदीप पुगांटी यांनी मला फोनव्दारे सांगीतले. तेव्हा मी वडसा येथे माझे काकाचे मरणाचे कामानिमीत्य असल्याने, चालक संदीप याचे मोबाईल वरून श्री. पोरेटी वनरक्षक, एटापल्ली बिट यांचेशी कामासंबधी बोलुन, त्यांना नंतर येवुन भेटतो असे सांगीतले, तेव्हा त्यांनी माझे दोन्ही ट्रॅक्टरवर कारवाई न करता सोडुन दिले होते. त्यानंतर श्री. पोरेटी वनरक्षक, एटापल्ली बिट यांनी मला एक दोन वेळा फोन करून कारवाई न करता ट्रॅक्टर सोडल्याचे मोबदला म्हणुन पैशाची मागणी करीत होते. परंतु मी माझे वैयक्तीक कामात व्यस्त असल्याने त्यांना नंतर येवुन भेटतो असे सांगीतले.

दिनांक 17/06/2023 रोजी मी घरी हजर असतांना माझे मोबाईलवर श्री. पोरेटी वनरक्षक यांनी फोन केले. परंतु मी फोन न उचलल्यामुळे त्यांनी माझे मित्र श्री. वनकर यांना फोन केले व त्यांना मला भेटण्यास सांगीतले. त्यानुसार मी श्री. पोरेटी वनरक्षक यांना भेटण्याकरीता वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय एटापल्ली येथे गेलो. तेव्हा त्यांनी मला '' ऐवढे दिवस कोठे गेल्या होत्या, तुमच्या बोलण्यावरून कारवाई न करता रेतीचे ट्रॅक्टर सोडले आहे, तुम्ही मला आज पावेतो 30,000/- रू. दिले नाही. तुम्ही जर मला 30,000/- रू. दिले नाही तर मी तुम्हाला रेती वाहतुक करू देणार नाही, असे म्हणाल्याने, मी घाबरून ठिक आहे, पैशाची व्यवस्था करून आपणास येवुन भेटतो, तेव्हा त्यांनी ठिक आहे. वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालयात येवुन भेट असे म्हणुन मला पैशाची मागणी केली.

श्री. पोरेटी, वनरक्षक, एटापल्ली बिट यांनी माझे दोन्ही ट्रॅक्टरने रेतीची वाहतुक करीत असतांना एटापल्ली नाक्याजवळ ट्रॅक्टर पकडुन कारवाई न करता सोडल्याचा मोबदला म्हणुन 30,000/-रू. लाच रक्कम मागणी केली

आहे. माझी श्री. पोरेटी वनरक्षक, एटापल्ली बिट यांना 30,000/- रू. लाच रक्कम देण्याची मुळीच ईच्छा नसल्याने मी रु. 30,000/- घेऊन आपले कार्यालयामार्फत कारवाई होणेकरीता स्वेच्छेने लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, गडचिरोली कॅम्प एटापल्ली येथे तक्रार देण्यास आलो.

श्री. पोरेटी वनरक्षक, एटापल्ली बिट जि. गडचिरोली यांचेशी माझे कोणतेही वैयक्तीक वैर नसुन आर्थिक देवाण-घेवाण/उसणवारी अथवा भांडण नाही. म्हणुन मी त्यांचेविरुध्द कायदेशिर कारवाई करण्याकरीता स्वेच्छेने तक्रार देत आहे. मी सोबत आणलेले रु. 30,000/- हे माझे वैयक्तिक बचतीतील आहेत.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी त्यांचे सोबत आलेल्या स्टॉफची व शासकिय पंचांची ओळख करून दिली. श्री श्रीधर भोसले यांनी दोन्ही पंचांना थोडक्यात हकिकत सांगुन माझे स्वहस्ताक्षरात लिहलेली तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या तक्रार अर्जावर मी स्वतः, दोन्ही पंचांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी सुद्धा स्वाक्षरी केली.

त्यानंतर पंचासमक्ष पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी दिलेल्या सुचनेवरून पोशी/ किशोर ठाकुर यांनी व्हॉईस रेकॉर्डर कशाप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती देवुन लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी माझेकडुन सापळा कारवाईसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम रू. 30,000/- (रू. 500/- दराच्या 60 चलनी नोटा) घेतल्या. त्यावेळी सदरच्या नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. त्यानंतर सदरच्या नोटांना अँथ्रॅसिन पावडर लावण्यात येणार असल्याचे सांगुन त्याचे गुणधर्म सांगीतले. तद्नंतर लाचेच्या रक्कमेस अँथ्रॅसिन पावडर लावली व त्याचे प्रात्याक्षीक करून दाखविले. याबाबतच्या सविस्तर नोंदी पंचनामा क्रं. 1 मध्ये घेतल्या आहेत.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंचासमक्ष गैरअर्जदाराकडे पडताळणी कारवाई करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन माझी अंगझडती घेवुन व्हॉईस रेकॉर्डर मध्ये नवीन मेमोरी कार्ड टाकुन व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचे श्री पोरेटी, वनरक्षक, यांना भेटण्यास मौजा एटापल्ली येथील पीडब्ल्युडी विश्रामगृह येथुन वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय एटापल्ली येथे मी आणलेल्या दुचाकी वाहन क्र. एमएच 33/आर 5243 ने रवाना केले. पडताळणी दरम्यान श्री. पोरेटी वनरक्षक, एटापल्ली बिट यांनी मला तु ऐवढे दिवस कोठे गेला होतास, तेव्हा मी काका मरण पावल्याने गावाला गेल्याचे सांगुन कामा संबधाने बोलणी करून गैरअर्जदार यांनी मला ट्रक्टरने रेतीची वाहतुक करीत असतांना एटापल्ली नाक्याजवळ ट्रक्टर पकडुन कारवाई न करता सोडल्याचा मोबदला म्हणुन 30,000/-रू. लाच रक्कम मागणी करुन तडजोडअंती 15,000/-रू. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्शविल्याने मी पंच क्रं. 1 सह नियोजीत ठिकाणी परत आलो. लाच रक्कम मागणी बाबतची पडताळणी कारवाई करून परत आल्याबाबत पंच क्रं. 1 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आला.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. श्रीधर भोसले साहेब यांनी पंच क्रं. 1 व 2 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डर मध्ये झालेले संभाषण एकुन व पंच क्र.1 यांचे घडलेल्या परिस्थीतीच्या कथनावरून श्री पोरेटी वनरक्षक यांनी माझ्या दोन्ही ट्रक्टरने रेतीची वाहतुक करीत असतांना एटापल्ली नाक्याजवळ ट्रक्टर पकडुन कारवाई न करता सोडल्याचा मोबदला म्हणुन 30,000/-रू. लाच रक्कम मागणी करुन तडजोडअंती 15,000/-रू. लाच रक्कम स्विकारण्याची तयारी दर्षविल्याची खात्री केली. त्यावरून श्री पोरेटी, वनरक्षक यांचे विरुध्द पुढील सापळा कारवाई करण्याचे ठरविण्यात आले. त्यानंतर माझी अंगझडती घेवुन श्री पोरेटी, वनरक्षक यांनी तडजोडीअंती 15,000/- रूपयाची मागणी केल्याने मला पंचासमक्ष अँथ्रॅसिन पावडर लावलेली 30,000/- रूपयापैकी 15,000/- रू. लाचेची रक्कम परत देण्यात आली. सदर 15,000/- रू. माझे फुलपॅन्टच्या उजव्या बाजुचे खिशात ठेवण्यात आली. सापळा कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवुन गैरअर्जदार श्री पोरेटी, वनरक्षक यांनी स्वतः किंवा इतर व्यक्तीच्या माध्यमातुन लाच रक्कम स्विकारल्यावर वन परिक्षेत्र कार्यालयाचे बाहेर दर्शनी भागी येवून गळयात असलेला पांढ-या रंगाचा दुपट्टा डोक्याला बांधुन इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणा-यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले.

त्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर पुन्हा सुरु करून व्हॉईस रेकॉर्डर वर पंच क्रं. 1 यांचे आवाजाचा नमुना घेवुन व्हॉईस रेकॉर्डर माझे ताब्यात देवुन मला पंच क्रं. 1 यांचेसह माझे स्वतःचे दुचाकी वाहन क्र. एमएच 33/आर 5243 ने गैरअर्जदारास भेटण्यास मौजा एटापल्ली येथील वनपरिक्षेत्र अधिकारी कार्यालय येथे पाठविण्यात आले. मी कार्यालयात गेलो असता, गैरअर्जदार श्री. पोरेटी वनरक्षक हे हजर मिळुन न आल्याने त्यांचे मोबाईल क्रमांकावर फोन

लावले असता, माझे फोन त्यांनी न उचलल्याने माझे व गैरअर्जदार यांचे मित्र श्री. वनकर यांना फोन लावुन श्री. पोरेटी वनरक्षक यांना माझे सेतु केंद्र दुकानात येण्याबाबत सांग, असे कळविले. तेव्हा श्री. वनकर हे माझे सेतु केंद्र दुकाणात आले व त्यांनी माझे दुकाणातुन गैरअर्जदार श्री. पोरेटी वनरक्षक यांना फोन लावुन जाभुळकर सेतु केंद्र एटापल्ली या दुकाणात येण्याबाबत सांगीतले. तेव्हा गैरअर्जदार श्री. पोरेटी, वनरक्षक हे माझे दुकाणात आले व त्यांनी इशा-याने पैशाची मागणी केली. तेव्हा मी 15,000/- रू. गैरअर्जदार श्री. पोरेटी यांना दिले व त्यांना मोजुन घ्या 15,000/- रू. आहेत असे म्हणालो असता, त्यांनी मला जे दिले ते दिले असे म्हणुन लाच रक्कम रू. 15,000/- उजव्या हाताने स्विकारुन जिन्सपॅन्टच्या उजव्या बाजुचे समोरील खिशात ठेवुन गैरअर्जदर यांचे सोबत कामासंबधाने बोलणी करून झाल्यानंतर मी पंच क्रं. 1 सोबत दर्शनी ठिकाणी येवुन सापळा पथकास माझे गळयात असलेला पांढ-या रंगाचा दुपट्टा डोक्याला बांधुन लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्याचवेळी सापळा पथकाने गैरअर्जदार श्री. पोरेटी, वनरक्षक, एटापल्ली बिट यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाई केली. सापळा कार्यवाही बाबतच्या सविस्तर नोंदी सापळा अधिकारी पोलीस निरीक्षक श्री श्रीधर भोसले यांनी पंचनामा क्रं. 2 मध्ये घेतल्या आहेत.

तरी लोकसेवक श्री. धनिराम अंताराम पोरेटी, वय 33 वर्ष, पद वनरक्षक, एटापल्ली बिट, वन परिक्षेत्र अधिकारी कार्यालय एटापल्ली ता. एटापल्ली जि. गडचिरोली यांनी आपल्या लोकसेवक पदाचा दुरूपयोग करून मी माझे ट्रॅक्टरने रेतीची वाहतुक करीत असतांना एटापल्ली नाक्याजवळ ट्रॅक्टर पकडुन कारवाई न करता सोडल्याचा मोबदला म्हणुन 30,000/-रू. लाच रक्कमेची मागणी करून तडजोडीअंती रु. 15,000/- रू. लाच रक्कम स्विकारतांना रंगेहात पकडण्यात आले. म्हणुन माझी त्यांच्याविरूद्ध कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरील फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (**केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.**)**

(1) **Registered the case and took up the investigation:**
**(**प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले**):**

RAVIRAJ SAYBANNA KAMBLE(SI (Sub-Inspector)) / DGPRSKM8901

(2) **Directed (Name of I.O.) (**तपास अधिका-याचे नाव**):** **or (**किंवा**)**

**Rank (**पद**):** **No.(**क्र.**):**

**to take up the Investigation (**ला तपास करण्याचे अधिकार दिले**) or (**किंवा**)**

(3) **Refused investigation due to (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**):**

**or (**ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला**)**

(4) **Transferred to P.S.**
**(**गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव**):**

**District (**जिल्हा**):**

**on point of jurisdiction (**को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित**) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (**प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली**,** बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.**)**

**R.O.A.C.(**आर. ओ .ए .सी.**)**

**14 Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(**तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा**):**

[signature]

**15. Date and time of dispatch to the court**
**(**न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ**):**

[signature]

प्रभारी अधिकारी
पोलीस स्टेशन एटापल्ली

**Signature of Officer in charge, Police Station**
**(**ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी**)**

**Name (**नाव**):** RAVIRAJ SAYBANNA
**Rank(**पद**):** SI (Sub-Inspector)
**No.(**सं.**):** DGPRSKM8901

[illegible]

**Attachment to item 7 of First Information Report (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): Physical features, deformities and other details of the ( If known / seen )(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))**

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
**(**जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.**)**